सोलापूर
तरुण भारत

# नांदेड विद्यापीठाच्या लोकप्रशासन अभ्यास मंडळ अध्यक्षपदी प्रा.बी आर कतुरवार

देगलूर - अडत व्यापारी शिक्षण संस्था संचालित देगलूर महाविद्यालयातील लोकप्रशासन विभाग व संशोधन केंद्रप्रमूख प्रा. डॉ. बी. आर. कतुरवार यांची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या Chairman, Board of Study in Public Administration लोकप्रशासन अभ्यास मंडळाच्या अध्यक्ष पदी निवड झाली आहे. प्रस्तुत निवड विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. उद्धव भोंसले , प्रकुलगुरु डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन व कुलसचिव डॉ. सर्जेराव शिंदे यानी विद्यापीठाच्या स्थायी समितीद्वारे ही निवड केली आहे. विद्यापीठ प्रशासनात देगलूर महाविद्यालयाच्या लोकप्रशासन विभागास मिळालेल्या बहुमानाबद्दल अड्त व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष काश पाटील बेंबरेकर, सचिव शशिकांत चिद्रावार, उपाध्यक्ष नारायणराव मैलागीरे, सहसचिव सुर्यकांत नारलावार, कोषाध्यक्ष विलास तोटावार व कार्यकारिणी मंडळ सदस्य राजकुमार महाजन, डॉ कर्मवीर उंग्रतवार, देवेंन्द्र मोतेवार, गंगाधर जोशी, जनार्दन चिद्रावार, रवींद्र अप्पा द्याडे, चंद्रकांत नारलावार, प्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, ऊपप्राचार्य निवृती गोविंदवार, पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील, कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी यांच्यासह सर्व प्राध्यापक कर्मचारी व विद्यार्थ्यानी यांनी आभिनंदन केले आहे.